## प्रेसनोट

जा.क्र. ३३६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०७/२०१८

# भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे नागरिकांना जाहीर आवाहन

भंडारा जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, '' गावामध्ये मुले पळवीणारी टोळी आहे. '' तसेच '' गावामध्ये दरोडा घालणा–या टोळया आल्या आहते.'' अशा प्रकारच्या अफवा सोशल मिडीया च्या माध्यमातुन व ईतर प्रकारे पसरवुन जनतेमध्ये घबराहट व भितीचे वातावरण पसरविण्यात येत आहे. सदर अफवामुळे वस्तीवर येणारे अपरीचीत लोक, साधु वेशातील लोक, किरकोळ विक्री करणारे फेरीवाले,यांना विनाकारण मारहाण होण्याचे व त्यामुळे काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही अश्या मारहाणीतुन कोणी व्यक्ती जखमी अगर मृत्यु मुखी पडल्यास सोशल मिडीया व इतर प्रकारे अफवा पसरविनाऱ्या इसमावर गुन्हे दाखल करण्यात येतील सदर अफवामुळे औरंगाबाद व धुळे जिल्हयात खुनाचा प्रकार झाला असुन ५ ते ६ लोकांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच अश्या प्रकारच्या घटणा नंदुरबार व मध्यप्रदेश येथे झाल्या आहेत. अशा प्रकारच्या अफवा पसरविनाऱ्या इसमावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तरी नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी अशा प्रकारच्या अफवावर विश्वास ठेवु नये. अगर कोणी अश्या अफवा पसरवित असल्याचे निर्दशास आल्यास तात्काळ पोलीस अधीक्षक कार्या. भंडारा यांचे व्हॉट्सॲप मो.क्र. ९४०५८३११००, ९४०५८४११०० या क्रमाकावर तसेच स्थानीक गुन्हे शाखा भंडारा ०७१८४–२५४७०२, नियत्रंण कक्ष ०७१८४–२५२४०० किंवा आपल्या नजिकच्या पोलीस ठाण्यात संपर्क करावा.

पोनी. एम. एम. सिडाम
जिवीशा शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र ८६९८७३९१९६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.